पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक-२
सभावृत्तांत

दि.- ६/५/२०१५ वेळ दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि.६/५/२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१ मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर - सभापती
२ मा.आल्हाट मंदा उत्तम
३ मा.संजय मल्हारराव वाबळे
४ मा.विश्वनाथ विठोबा लांडे

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.
मा.क्षेत्रीय अधिकारी- श्रीम.आशादेवी दुरगुडे, मा.श्रीनिवासदांगट- प्रशासन अधिकारी, मा.श्री.वसंत साळवी – कार्यकारी अभियंता- स्थापत्य, मा.श्री.एच. एस. शिंदे - उपअभियंता स्थापत्य, मा.श्री.मनोज सेठीया - उपअभियंता ड्रेनेज, मा.श्री.माने- उपअभियंता, (पापु) मा.श्री.व्ही.सी.काळे – उप अभियंता, मा.श्री.इप्पकायल एस.एच.- लेखाधिकारी, मा.श्री.हनवते प्रशात – समाजसेवक, नावियो विभाग, मा.श्री.बर्डे एस.व्ही. – नावियो विभाग, मा.श्री.खडतरे एस.एस. – क.अभियंता- नगररचना विभाग, मा.श्री.भाउसाहेब साबळे- स्थापत्य, मा.श्री.कु-हाडे एस.एस.– क. अभियंता, मा. श्री.वाघमारे एस.बी.-उपअभियंता,मा.श्री.रावते एस.डी- ऑ.टी.यु., मा.श्री.तापकीर बी.के.- उद्यान सहाय्यक, मा.श्री.नांगरे एस.एन.- क.अ. (वि), मा.श्री.पवार वैभव – क.अ. (वि)

**मा.सभापती-** सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्रमांक १-** प्र.क्र.७ च-होली येथे स्थापत्यविषयक कामे करणेबाबत.
मा.विनया तापकीर यांचे पत्र.

**विषय क्रमांक २)-** वाहनचालक विश्रामगृह व म.न.पा.चे वाहनाकरीता पार्कींग शेड तयार करुन मिळणेबाबत. मा.विनया तापकीर यांचे पत्र.

-----

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक- मा. संजय वाबळे　　　　　　　　　　　　　अनुमोदक- मा.मंदा आल्हाट

**मा.सभापती -** नेपाळ आणि भारतात झालेल्या विनाशकारी भुकंपामध्ये मृत्यूमुखी पडलेल्या नागरीकांना इ प्रभाग समितीच्या वतीने सर्वानी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वानी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

-------

**मा.सभापती-** उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने आज दि. ६/५/२०१५ रोजीची सभा गणसंख्येअभावी १५मिनीटे तहकूब करुन ती सभेच्याच दिवशी ३.१५वा. मिनीटांनी घेणेत यावी.

-----

(मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर)
सभापती
इ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक-२
सभावृत्तांत
(दि.६/५/२०१५ ची तहकूब सभा)

दि.- ६/५/२०१५ वेळ दुपारी ३:१५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची तहकूब सभा बुधवार दि.६/५/२०१५ रोजी दुपारी ३.१५ वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१ मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर - सभापती
२ मा.आल्हाट मंदा उत्तम
३ मा.संजय मल्हारराव वाबळे
४ मा.विश्वनाथ विठोबा लांडे

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.
मा.क्षेत्रीय अधिकारी- श्रीम.आशादेवी दुरगुडे, मा.श्री.दांगट- प्रशासन अधिकारी, मा.श्री.वसंत साळवी – कार्यकारी अभियंता- स्थापत्य, मा.श्री.एच.एस.शिंदे - उपअभियंता स्थापत्य, मा.श्री.मनोज सेठीया - उपअभियंता ड्रेनेज, मा.श्री.माने- उपअभियंता, (पापु) मा.श्री.व्ही.सी.काळे – उप अभियंता, मा.श्री.इप्पकायल एस.एच.- लेखाधिकारी, मा.श्री.हनवते प्रशात – समाजसेवक, नावियो विभाग, मा.श्री.बर्डे एस.व्ही. – नावियो विभाग, मा.श्री.खडतरे एस.एस. – क.अभियंता- नगररचना विभाग, मा.श्री.भाउसाहेब साबळे- स्थापत्य, मा.श्री.कु-हाडे एस.एस.– क. अभियंता, मा. श्री.वाघमारे एस.बी.- उपअभियंता,मा.श्री.रावते एस.डी- ऑ.टी.यु., मा.श्री.तापकीर बी.के.- उद्यान सहाय्यक, मा.श्री.नांगरे एस.एन.- क.अ. (वि), मा.श्री.पवार वैभव – क.अ. (वि)

**मा.सभापती-** सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

---

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्रमांक १-** प्र.क्र.७ च-होली येथे स्थापत्यविषयक कामे करणेबाबत.
मा.विनया तापकीर यांचे पत्र.

**विषय क्रमांक २)-** वाहनचालक विश्रामगृह व म.न.पा.चे वाहनाकरीता पार्कींग शेड तयार करुन मिळणेबाबत. मा.विनया तापकीर यांचे पत्र.

----

अ) दिनांक ०४/०३/२०१५ रोजी झालेल्या सभेचा(कार्यक्रमपत्रिका १३) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक १०/०४/२०१५ रोजी झालेल्या सभेचा(कार्यक्रमपत्रिका १) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-----

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक- ३ विषय क्रमांक- १
दिनांक- ६/५/२०१५
सूचक- मा.विनया तापकीर अनुमोदक-मा. मा.आल्हाट मंदा उत्तम
संदर्भ- मा. विनया तापकीर यांचे पत्र.

प्र.क्र.७ च-होली हा ग्रामीण भाग नव्याने ताब्यात आलेला आहे. च-होली, वडमुखवाडी, चोविसावाडी या ग्रामीण भागामधील लोकांचा व्यवसाय मुख्यत: शेती असलेने नागरिकांची घरे शेतीमध्ये आहेत. सदर ग्रामीण भागातील घरे शेतामध्ये असलने घराभोवती स्वच्छता राहत नाही. त्यामुळे घरांच्या परिसरामध्ये साप, किटक, मुंगी, व इतर प्राणी चावल्यामुळे प्राणहानी होण्याची शक्यता असलेने सदर घरांचे कडेला पेव्हींग ब्लॉक बसविणे, काँक्रीट करणे व लाईटची व्यवस्था करणेत यावी. खाजगी मिळकतीमध्ये सामाजिक दायीत्व दृष्टीने म.न.पा.मार्फत काम करणे गरजेचे आहे. तरी स्थापत्य विषयक कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- ४ विषय क्रमांक- २
दिनांक- ६/५/२०१५
सूचक- मा.विनया तापकीर अनुमोदक-मा. मा.आल्हाट मंदा उत्तम
संदर्भ- मा. विनया तापकीर यांचे पत्र.

इ क्षेत्रीय कार्यालयातील सर्व वाहन चालकांसाठी त्यांनी मागणी केलेप्रमाणे आपणास विनंतीपुर्वक निवेदन करण्यात येते की, आपल्या क्षेत्रीय कार्यालयात वाहन चालकांना विश्रामगृह नसल्याने त्यांना इतरत्र कार्यालयात फिरावे लागते व जेवणाकरीता कुठल्यातरी झाडाखाली जेवण करावे लागते तसेच महानगरपालिकेच्या वाहनांकरीता पार्कींगची सोय नसल्याने वाहने कार्यालयाचे आवारात अस्ताव्यस्त उभी करावी लागतात तरी वाहनाकरीता पत्राशेड व विश्रामगृह बांधून मिळण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**सही/-**

(मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर)
सभापती
इ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - ३९
क्र-इक्षेका/कावि/४/ /२०१५
दिनांक- /५/२०१५

सही/-
प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)
**( इ क्षेत्रीय कार्यालय)**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

दिनांक ६/५/२०१५ चे मासिक सभेत मा.सदस्यांनी खालीलप्रमाणे चर्चा केली.

-----

**मा.विश्वनाथ लांडे -** भोसरी येथील डी.पी.रस्त्याबाबत पत्र दिले आहे त्याबाबत गेली सहा महिन्यापासून विचारणा करत आहे. ब्लॉकचे काम अजून काहीच झालेले नाही. रंगीत ब्लॉक का टाकत नाहीत. इंद्रायणीनगर परिसरातील अतिक्रमण काढणेत यावीत. सगळीकडे अतिक्रमणचे काम होत आहे याबाबत काय करत आहात. आतापर्यंत किती टप-या काढल्या. कुठलेच काम आतापर्यंत झालेले नाही. ब्लॉकचे काम काहीच झाले नाही.

**मा.व्ही.सी.काळे (उपअभियंता)–** आता या नवीन अंदाजपत्रकामध्ये विकासकामे होईल.

**मा.विश्वनाथ लांडे –** पिण्याच्या पाण्या संदर्भात काय परिस्थिती आहे याबाबत चौकशी करणे, कुठले पाणी आहे. आपली प्रोसीस काय आहे हे पहावे. कुणाचा तो प्लॉट आहे. आपण आपले पाण्याचे टँकर बंद केले नाही.

**मा.माने(उपअभियंता पापु)–** – त्या ठिकाणी विहीर किंवा बोअरवेल असेल.

**मा.मंदाताई आल्हाट -** मोशी येथील ६१ मी देहू रस्त्याचे तसेच ९ मी. ,१२ मी. ,१८ मी.रस्त्याबाबत काय झाले व मोशी येथील सस्तेवाडी मधील डांबरीकरणाचे काय झाले अशी विचारणा केली.

**मा.विनयाताई तापकीर** – कुठल्याही कामाचे आऊटपूट मिळाले पाहिजे. वेळ दिला पाहिजे. मा.आयुक्त साहेबांना आपण दि.११/०५/२०१५ रोजी दुपारी ४.०० वा. बोलविणार आहे. त्यांचेसोबत आढावा मिटींग घेण्यात येईल. मिटींगमध्ये जी चर्चा होईल त्याचा आढावा घेण्यात यावा.

**मा.विश्वनाथ लांडे -** शिवाजी महाराजांचा पुतळा आहे त्या ठिकाणी शिडी लावण्यात यावी. शांतीनगर येथील गेट बसविणेत यावे.

**मा.गणबोटे(उपअभियंता )–** – शांतीनगर येथील गेट बसवून देतो.

**मा.विनयाताई तापकीर -** च-होली येथील पाणीपुरवठयाबाबत कामे करणे.

**मा.माने(उपअभियंता पापु) -**फक्त मिलीटरी एरियातील काम बंद आहे. सर्वच अर्जंट कामे झाली होती.

**मा.विनयाताई तापकीर -** ठेकेदार अजून का आले नाहीत. पाच महिने झाले अजून काहीच कामे केली नाही म्हणून ठेकेदारांना पत्र पाठवणे. ठेकेदार का येत नाही. दि.१६/०५/२०१५ रोजी दुपारी ३.०० वा. विकासकामाबाबत बैठक घेण्यात येईल.

**मा.माने (उपअभियंता पापु) –** कामाची वर्क ऑर्डर दिलेल्या आहेत.

**मा.विनयाताई तापकीर -**मार्च अखेरला कामे घेतल्यामुळे सगळी कामे अर्धवट पडून आहेत. विद्युत विभागाचे एलईडी बाबत काय धोरण आहे.

**मा.इ.पाटील (उपअभियंता )–** विद्युत विषयक बरीच कामे झालेली आहे.

**मा.मंदाताई आल्हाट –** सगळीकडे एकसारखे दिवे लावण्यात यावे.

**मा.विनयाताई तापकीर –** धोरणात्मक निर्णय विशिष्ट पातळीवर झाले तर अंमलबजावणी करु शकतो. अंडरग्राऊंड रस्तेबाबत पत्र दिले आहे. त्यांनी पैसे भरलेले आहे का. रस्ते खोदले नाही. बीव्हीजीने पैसे नाही भरले.

**मा.वसंत साळवी (कार्यकारी अभियंता, स्थापत्य)– –** परमिशन दिली की ते पैसे भरतील.

**मा.विनयाताई तापकीर –** बीव्हीजीने कॉन्ट्रॅक्ट घेतले आहे.

**मा.एच.शिंदे (उपअभियंता, स्थापत्य)** – मोशी नवीन गांव आहे त्यामुळे ९० टक्के जागा ताब्यात घ्यायच्या आहेत.

----

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.